28 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे कामकाज सक्षम व सुरळीत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## कुलसचिव विलास नांदवडेकर यांचा दावा

'कुलपती कार्यालयाकडून कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे मुंबई विद्यापीठाची अतिरिक्त जबाबदारी ही एका अतिविशिष्ट आणि अतिगंभीर परिस्थितीमध्ये सोपवली आहे. कुलपती कार्यालयाच्या सूचनेनुसार डॉ.शिंदे हे मुंबई तसेच शिवाजी विद्यापीठाचा कार्यभार सांभाळत आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठातील कामकाज सुरळितपणे सुरू असून नियमित कामकाजातील कोणतेही प्रस्ताव प्रलंबित नाहीत,असा दावा शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी मंगळवारी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केला.

'महाराष्ट्र टाइम्स'ने १५ व २२ मार्च रोजी अनुक्रमे 'कुलगुरु मुंबईत पूर्णवेळ आणि विद्यापीठात प्रभारी' व 'चाळीस लाखांची उधळपट्टी' असे वृत्त प्रसिध्द केले होते. त्या संदर्भात खुलासा करताना कुलसचिव नांदवडेकर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, 'मुंबई विद्यापीठातील सारे वरिष्ठ अधिकारी प्रभारी आहेत. त्यामुळे दिलेल्या जबाबदारीनुसार तेथील कारभारावर डॉ. शिंदे यांनी अधिक लक्ष देणे आवश्यक ठरते. याचा अर्थ त्यांचे शिवाजी विद्यापीठाकडे दुर्लक्ष होते असे म्हणणे अन्यायकारक आहे. तसे असते तर कुलपती कार्यालयाकडून विचारणा झाली असती. शिवाजी विद्यापीठातील महत्त्वाच्या बैठका, कार्यक्रम, उपक्रमांना ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन करतात.'विद्यापीठाच्या कामकाजाचे योग्य पध्दतीने विक्रेंदीकरण केले आहे. त्यामुळे कुलगुरु नसल्यामुळे प्रशासकीय कामकाजात शिथिलता येत नाही. ते नसल्यामुळे फायली, प्रस्तावांचा निपटारा होत नाही असे नाही. प्र-कुलगुरु अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत. बरीच प्रकरणेही कुलसचिव, परीक्षा संचालक व वित्त लेखाधिकाऱ्यांच्या पातळीवर निकाली काढली जातात. अधिविभागीय स्तरावरील निर्णयाचे बहुतेक अधिकार अधिविभाग प्रमुखांना दिले आहेत. त्यांच्या स्तरावरील कोणताही प्रस्ताव प्रलंबित राहण्याचा प्रश्न उदभवत नाही. प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, विद्यापीठातील अभ्यास मंडळाचे काम सुरळीत सुरूआहे. २०१८-१९ या वर्षांपासून सीबीसीएस लागू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. याबाबत कॉलेजस्तरावर कार्यशाळा घेण्याची तयारी सुरु आहे. बीएस्सी, बीकॉम, बीए या अभ्यासक्रमाची पुनर्रचना, नियमावलीचे मसुदे तयार करुन त्यासाठी येत्या विद्या परिषदेच्या बैठकीत अंतिम मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहेत. कुलगुरु विद्यापीठात असताना विद्यापीठ तसेच विद्यापीठाबाहेरील सर्व संबंधित घटकांशी सातत्याने संवाद साधण्यावर भर देत असतात. आवश्यक त्या सूचना प्रशासनाला करीत असतात.



### निवासस्थानाशेजारी कार्यालय अत्यावश्यक


कुलगुरुंच्या निवासस्थानाशेजारी कार्यालय ही एक आवश्यक बाब असते. सुट्टीच्या दिवशी अथवा कार्यालयीन वेळेनंतर अनेक अभ्यागत येत असतात. अशावेळी त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी निवासस्थानाशेजारी कार्यालय आवश्यक आहे. राज्यातील बहुतेक विद्यापीठांमध्ये अशा प्रकारची कार्यालये आहेत. शिवाजी विद्यापीठात यापूर्वीच अशा प्रकारची सुविधा निर्माण होणे आवश्यक होते. यापूर्वी कुलगुरुंसाठी संपूर्ण नव्याच निवासस्थानाचा प्रस्ताव मंजूर झाला होता. तथापि नवीन निवासस्थानाऐवजी सध्याच्याच निवासस्थानी आवश्यक त्या सुविधांची निर्मिती करुन अनावश्यक खर्च वाचवावा असे कुलगुरुंनी सांगितले होते. त्यानुसार निवासस्थानाशेजारी कार्यालयाची निर्मिती करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2018
लोकमत

## शिवाजी विद्यापीठ : ३६१ कोटींचे अंदाजपत्रक; प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

# नावीन्यपूर्ण योजनांना बळ






लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संशोधनवृद्धी योजना, प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी अकॅडमी, विनाअनुदानित महाविद्यालयांना साहाय्य, नावीन्यपूर्ण योजनांना बळ देणारे शिवाजी विद्यापीठाचे ३६१ कोटी ७९ लाख २४ हजार ५०० रुपयांचे अंदाजपत्रक अधिसभेने मंगळवारी मान्य केले. या वर्षीचे अंदाजपत्रक २ कोटी ६५ लाख १३ हजार रुपये इतक्या तुटीचे आहे.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या अधिसभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. अधिसभेसमोर विद्यापीठाचे सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक आणि २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी मांडले. या अंदाजपत्रकात ३६१ कोटी ७९ लाख २४ हजार ५०० रुपये अपेक्षित जमा आणि अपेक्षित खर्च ३६४ कोटी ४४ लाख ३७ हजार ५०० रुपये आहे. देखभाल, विकास, वेतन, संस्था योजना आणि निलंबन लेखे यामध्ये संबंधित अंदाजपत्रक विभागले आहे. यात पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संशोधनवृद्धी योजनेंतर्गत दहा लाख रुपयांची तरतूद केली आहे. यातून दरमहा पाच हजारप्रमाणे सहा महिन्यांसाठी प्रतिविद्यार्थ्यांसह तीस हजार रुपये संशोधन कार्यासाठी दिले जाणार आहे. प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अकॅडमी स्थापन केली जाणार असून, यासाठी दहा लाखांची तरतूद केली आहे. विद्यापीठाच्या विविध घटकांसाठी नावीन्यपूर्ण योजना राबविण्याकरिता ५० लाखांची, तर विविध विभाग, अधिविभागांचे नूतनीकरण, प्रयोगशाळा उभारणीसाठी घसारा निधीतून १८ कोटी ५२ लाख, संशोधन व विकास निधीतून २३ कोटी ८६ लाख रुपयांची तरतूद केली आहे. 'नॅक'कडून मूल्यांकन झाले नसलेल्या विनाअनुदानित महाविद्यालयांना अग्रणी महाविद्यालय योजनेतून साहाय्य करण्याची योजना प्रस्तावित केली आहे. या अंदाजपत्रकांतील विविध तरतुदींबाबत सभागृहात दीड तासाहून अधिक वेळ चर्चा चालली. यानंतर सभागृहाने अंदाजपत्रकाला मान्यता दिली.

### सदस्यांकडून विविध सूचना

अधिसभेत सन २०१६-१७ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांनी मांडला. यातील संशोधनावरील खर्च, त्यासह जमा याबाबत मुद्दे मांडले. त्यावर प्रभारी वित्त लेखाधिकारी अजित चौगुले आणि डॉ. कारंडे यांनी स्पष्टीकरण दिले. यानंतर सभागृहाने या अहवालाला मंजुरी दिली. यानंतर प्राचार्य डॉ. कणसे यांनी सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक सादर केले. यावर उपस्थित सदस्यांनी विविध सूचना केल्या. यात नसिमा हुरजूक यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शासन आदेश, नियमानुसार तरतूद करावी असे सुचविले. यशवंत भालकर यांनी कलाकार असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने भत्ता द्यावा, अशी सूचना केली. शंकरराव कुलकर्णी यांनी प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देताना शुल्क आकारावे असे सांगितले. यानंतर कंत्राटी सुरक्षारक्षकांच्या वेतनापोटी केलेली तरतूद एक कोटीने कमी करावी. खेळाडूंचा भत्ता, शिक्षकांचा संशोधन निधी वाढावा, अशा विविध सूचना सभागृहात झाल्या. या सूचना नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट केल्या जातील, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

### अन्य तरतुदी अशा

- चर्चासत्र, परिसंवाद, विविध अभ्यासक्रमांसाठी १० लाख
- संशोधन गुणवत्तावाढीच्या दृष्टीने स्कोपअस् डाटाबेससाठी १५ लाख
- प्लगारिझम चेकिंग सॉफ्टवेअरसाठी ७ लाख, बुक्स अँड जर्नल्स, ई-डाटाबेससाठी १ कोटी ३० लाख
- वृक्षलागवड, संगोपनासाठी २५ लाख
- शिवपावन प्रेरणा साहस कॅम्पच्या राज्यस्तरीय नियोजनासाठी ८ लाख

### पेपरलेस अंदाजपत्रक

विद्यापीठाने सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक आणि या वर्षीचे अंदाजपत्रक ऑनलाईन पेपरलेस पद्धतीने सादर केले. त्यासाठी वित्त विभागाने स्वत:ची वेबबेस्ड अंदाजपत्रक प्रणाली विकसित केली. याद्वारे सर्व विभाग, अधिविभागांना स्वतंत्र ऑनलाईन लॉगीन दिले. अधिसभेवेळी सदस्यांना विद्यापीठाने जमाखर्च, अंदाजपत्रकासाठीची सर्व माहिती या लॉगीनमध्ये लॅपटॉपवर उपलब्ध करून दिली होती. अधिसभेतील बहुतांश सदस्य नवीन असल्याने अंदाजपत्रक, ताळेबंदाची कागदी प्रत मिळावी, अशी मागणी काही सदस्यांनी केली. तिला कुलगुरुंनी मान्यता दिली.

### विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधा

खेळाडूंचा भत्ता वाढविला जाईल. त्यासह त्यांना विमा संरक्षण देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या. विद्यापीठाच्या खेळाडूंना दोन लाख रुपये देण्यात येतील, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी अधिसभेत सांगितले. ते म्हणाले, विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अकॅडमी सुरु केली जाईल. हा राज्यातील विद्यापीठ पातळीवर पहिलाच प्रयत्न आहे.

### 'सुटा'ला अंदाजपत्रक अमान्य : पाटील

कुलगुरुंनी अंदाजपत्रकाबाबतच्या तरतुदींचा भंग केला आहे. शिवाय त्यांनी 'सुटा'च्या सदस्यांचे ठराव, प्रश्न नाकारल्याने आम्ही अधिसभेवर बहिष्कार घातला आहे; त्यामुळे 'सुटा'ला हे अंदाजपत्रक मान्य नाही, असे 'सुटा'चे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष अरुण पाटील यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
28 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिकीकरण, संशोधनासाठी तरतूद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

संशोधन प्रसार विद्यार्थ्यांना भरीव तरतूद, पुस्तके, जर्नल व ई डेटाबेससाठी एक कोटी ३० लाख, विविध अधिविभागाचे आधुनिकीकरण व नूतनीकरण, प्रयोगशाळा उभारणी व बांधकाम घसारा निधीतून १८ कोटी उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची तरतूद असलेले शिवाजी विद्यापीठाचे २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी बजेट मंगळवारी सादर करण्यात आले. ३६१ कोटीच्या आर्थिक तरतूदींचा लेखाजोखा यावेळी मांडला. दरम्यान येत्या आर्थिक वर्षाच्या २ कोटी, ६५ लाख, १३ हजार इतक्या रकमेच्या तुटीच्या अंदाजपत्रकास अधिसभेने मंजुरी दिली.

संशोधक व विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी आर्थिक तरतुदीत वाढ करावी, दिव्यांगांसह खेळाडूंना सुविधा व भत्ते वाढ करावी, कंत्राटी सुरक्षारक्षकांसाठी असलेल्या आर्थिकबजेटमध्ये एक कोटी रुपयांची कपात करावी या प्रमुख सूचनांसह अनेक सूचना करण्यात आल्या. या सूचना विचारात घेऊन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार सुधारीत बजेटमध्ये समाविष्ट करण्यात येतील, असे आश्वासन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी यावेळी दिले.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मंगळवारी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत अंदाजपत्रक सादर करण्यात आले. पेपरलेस संकल्पनेवर आधारित यंदाचे बजेट वेबबेस्ट प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाइन सादर करण्यात आले. यावेळी सदस्यांना लॅपटॉप सीडी स्वरुपात अंदाजपत्रकाची ऑनस्क्रीन प्रत देण्यात आली. अंदाजपत्रकात देखभाल अंदाजपत्रक, विकास अंदाजपत्रक, वेतन अंदाजपत्रक, एजन्सी, निलंबन अशा पाच विभागात आर्थिक तरतुदीची विभागणी केली आहे. याआधारे सदस्यांनी खर्च व शिल्लक या ताळमेळाबाबत प्रश्न उपस्थित केले. दरम्यान गतवर्षीचा अंदाजपत्रक प्रस्ताव प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांनी सादर केला. दरम्यान येत्या अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदींसंदर्भात उपस्थित करण्यात आलेले प्रश्न, सूचना यांना प्राचार्य कारंडे यांच्यासह प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी उत्तरे दिली. यावेळी सविस्तर चर्चा करून अधिसभेने अंदाजपत्रकास मंजुरी दिली.



## विद्यापीठाचे बजेट ३६१ कोटींचे

विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा, खेळाडूंसाठी भत्यात वाढ, कलाकार विद्यार्थ्यांना सुविधा, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुविधा यासाठीच्या आर्थिक तरतुदीत वाढ करण्याची सूचना सदस्यांनी मांडली. कुलगुरू, प्र-कुलगुरू कार्यालयातील संगणक बदलावर होणाऱ्या खर्चावर यावेळी सदस्यांनी आक्षेप घेतला.

यावेळी बोलताना कुलगुरू शिंदे म्हणाले, 'खेळाडू विद्यार्थ्यांसाठी विमा योजना सुरू करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या आहारासाठी दोन लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.'

### अंदाजपत्रकातील ठळक वैशिष्ट्ये

येत्या वर्षातील अंदाजपत्रकात संशोधन प्रसार योजनेसाठी दहा लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याद्वारे दरमहा पाच हजार रुपये याप्रमाणे सहा महिन्यांसाठी प्रति विद्यार्थी तीस हजार रुपये संशोधन कार्यासाठी देण्याचा प्रस्ताव आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी दहा लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संशोधन गुणवत्ता वाढीच्यादृष्टीने सबस्क्रीब्शन ऑफ डेटाबेस यासाठी पंधरा लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर अद्ययावत संगणक प्रणालीवर येत्या वर्षात सात लाख रूपये खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. पुस्तके, जर्नल व ई डेटाबेससाठी एक कोटी ३० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विविध अधिविभागाचे आधुनिकीकरण व नूतनीकरण, प्रयोगशाळा उभारणी व बांधकाम घसारा निधीतून १८ कोटी ५२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संशोधन विकास निधीतून २३ कोटी, ८६ लाख रुपयांची तरतूद प्रस्तावादाखल समाविष्ट करण्यात आली आहे. नाविन्यपूर्ण योजनांसाठी ५० लाख तर नॅक संस्थेकडून मूल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांना प्रमुख कॉलेजमधून सहाय्य करण्याची योजना करण्यात आली आहे. शिवपावन प्रेरणा साहस कॅम्पचे राज्यस्तरीय नियोजन करण्यासाठी आठ लाख रुपयांची तरतूद राष्ट्रीय सेवा योजनेतून करण्यात आली.

### खोटी बिले सादर करणाऱ्यांवर कारवाई करा

खोटी प्रवासबिले जोडणाऱ्या अधिष्ठाता प्राध्यापक जे. एस. पाटील यांच्याकडून केवळ रक्कम वसूल करण्याची तोंडदेखली कारवाई केली आहे. ही कारवाई चुकीची असल्याचा मुद्दा अमरसिंह रजपूत यांनी मांडला. प्रा. पाटील कराड येथे नोकरीत असूनही साताऱ्यापासूनची प्रवासबिले घेतली आहेत. अशा बेकायदा बिलांची रक्कम सादर करणाऱ्या प्राध्यापकावर केवळ रक्कम वसूल करण्याची क्षुल्लक कारवाई केल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे खोटी बिले सादर करायची व उघड झाल्यास दंडात्मक रक्कम जमा करायची असा चुकीचा पायंडा पडेल याकडेही या प्रश्नाच्यानिमित्ताने लक्ष वेधण्यात आले.

28 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गांधीजींच्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेची आज गरज

## ज्येष्ठ अभ्यासक अरुण खोरे यांचे प्रतिपादन : विद्यापीठातील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सेवाभाव, सत्यकथन आणि पारदर्शकता ही महात्मा गांधी यांच्या पत्रकारितेची मूलभूत वैशिष्ट्ये होती. आजच्या काळात गांधींच्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेची प्रस्तुतता अधिकच अधोरेखित झालेली आहे, असे प्रतिपादन गांधी विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक अरुण खोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनाप्रसंगी बीजभाषणात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषण करताना गांधी विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक अरुण खोरे. सोबत डावीकडून डॉ. शिवाजी जाधव, विजय नाईक , डॉ. भारती पाटील.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने मानव्यविद्या सभागृहात 'महात्मा गांधी यांची पत्रकारिता आणि तिची प्रस्तुतता' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राच्या उद्‌घाटनाप्रसंगी अरुण खोरे म्हणाले, बौद्धिक प्रामाणिकता आणि विचारांची स्पष्टता यामुळे महात्मा गांधी यांची पत्रकारिता तत्कालिन परिस्थितीत झळाळून पुढे आली. लंडन टाइम्स, डेली मेल आदी दक्षिण आफ्रिकेबाहेरील देशांमधील वृत्तपत्रांना पत्रे पाठवून त्यांनी आफ्रिकेमधील लढा जगभर पोहोचविला. जनमाणसाला शिक्षित करण्याचे ध्येय उराशी बाळगून त्यांनी पत्रकारितेचे व्रत हाती घेतले होते. राष्ट्रभावनेने प्रेरित निर्भय समाजमन घडविण्याकडे त्यांच्या समग्र पत्रकारितेचा कल होता. गांधीजी वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या बाजूचे होते; मात्र, हाती आलेल्या सत्तेचा दुरुपयोग करणे मात्र चुकीचे आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

खोरे पुढे म्हणाले, गांधीजींनी ग्रामस्वराज्य आणि ग्रामस्वच्छता या बाबींना आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून प्राधान्याने देशासमोर आणले. तसेच ग्रामीण भारताचे प्रश्न ऐरणीवर आणून ते प्रश्न सोडविण्यासाठी कृतीशील कार्यक्रम देण्यातही गांधींची पत्रकारिता आघाडीवर होती. देश आत्मनिर्भर होण्यासाठी ग्रामीण भारत स्वंयपूर्ण व स्वावलंबी झाला पाहिजे, यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी त्यांनी हरिजन वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणाचे महत्वाचे कार्य हाती घेतले. मात्र, गांधीजींच्या या कार्याकडे त्यांच्या समकालिनांनी मात्र म्हणावे तितके लक्ष दिले नाही, याची खंत वाटते.

विजय नाईक म्हणाले की, गांधीजी हे विसाव्या शतकातील एक महान संज्ञापक होते. दक्षिण आफ्रिका असो अगर भारत, या दोन्ही देशांतील सर्वसामान्य, शोषित नागरिकांच्या हक्कांसाठी लढा देण्यासाठी त्यांनी आपली पत्रकारिता पणाला लावली. स्वागत व प्रास्ताविक गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी तर डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, प्रा. मीना देशपांडे, डॉ. चैत्रा रेडकर, डॉ. राजन गवस, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदींसह संशोधक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

### गांधीजींची पत्रकारितेची मूलतत्त्वे अप्रस्तुत ठरतात की काय...

संपादकाची बांधिलकी ही मालक किंवा संस्थेशी नव्हे, तर वाचकाशी असली पाहिजे, असे सांगणाऱ्या गांधीजींची पत्रकारितेची मूलतत्त्वे आजच्या भोवतालात अप्रस्तुत ठरतात की काय, अशी भीती निर्माण झाल्याचे मतही खोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# गांधींच्या मूल्याधिष्ठीत पत्रकारितेची गरज

म. टा. प्रतिनिधी कोल्हापूर

'सेवाभाव, सत्यकथन आणि पारदर्शकता ही महात्मा गांधी यांच्या पत्रकारितेची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. आजच्या काळात गांधींच्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेची प्रस्तुतता अधिकच अधोरेखित झालेली आहे,' असे प्रतिपादन गांधी-विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक अरुण खोरे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने 'महात्मा गांधी यांची पत्रकारिता आणि तिची प्रस्तुतता' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे

## अरुण खोरे यांचे प्रतिपादन

उद्घाटन आज झाले. त्यावेळी बीजभाषण करताना खोरे बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विजय नाईक होते.

खोरे म्हणाले, 'बौद्धिक प्रामाणिकता आणि विचारांची स्पष्टता यामुळे महात्मा गांधी यांची पत्रकारिता तत्कालीन परिस्थितीत झळाळून पुढे आली. लंडन टाइम्स, डेली मेल आदी दक्षिण आफ्रिकेबाहेरील देशांमधील वृत्तपत्रांना पत्रे पाठवून त्यांनी आफ्रिकेमधील लढा जगभर पोहोचविला. जनमानसाला शिक्षित करण्याचे ध्येय उराशी बाळगून त्यांनी



अरुण खोरे

पत्रकारितेचे व्रत हाती घेतले होते. राष्ट्रभावनेने प्रेरित निर्भय समाजमन घडविण्याकडे त्यांच्या समग्र पत्रकारितेचा कल होता. गांधीजी वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या बाजूचे होते; मात्र, हाती आलेल्या सत्तेचा दुरुपयोग करणे मात्र चुकीचे आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.'

ग्रामस्वराज्य आणि ग्रामस्वच्छता या बाबींना पत्रकारितेच्या माध्यमातून प्राधान्याने देशासमोर आणताना ग्रामीण भारताचे प्रश्न ऐरणीवर आणून ते प्रश्न सोडविण्यासाठी कृतीशील कार्यक्रम देण्यातही गांधींची पत्रकारिता आघाडीवर होती, असे खोरे यांनी सांगितले.

विजय नाईक म्हणाले की, गांधीजी हे विसाव्या शतकातील एक महान संज्ञापक होते. दक्षिण आफ्रिका असो अगर भारत, या दोन्ही देशांतील सर्वसामान्य, शोषित नागरिकांच्या हक्कांसाठी लढा देण्यासाठी त्यांनी पत्रकारिता पणाला लावली. जे आजच्या पत्रकारितेच्या सद्यस्थितीची चिंता करतात, त्यांच्यासाठी गांधींची पत्रकारितेचे मूल्य मोठे आहे; मात्र, ज्याचे त्यांना मोल नाही, त्यांच्यासाठी गांधी अप्रस्तुत ठरतील, ही मात्र चिंतेची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

28 MAR 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाळासाहेब देसाईंनी लोकहितासाठी क्रांतिकारी निर्णय घेतले : प्रा. थोरात

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना प्रा. ए. जी. थोरात. शेजारी डॉ. डी. आर. मोरे व डॉ. डॉ. अवनीश पाटील.

कोल्हापूर, ता. २७ : "सत्ता ही जनतेच्या कल्याणासाठी आहे याची जाणीव असणारा आणि लोकहितासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी असणारा महान नेता म्हणजे लोकनेते बाळासाहेब देसाई. त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. बहुजन समाजापर्यंत ज्ञानाची गंगोत्री पोचवणाऱ्या ईबीसी सवलतीचे श्रेयही देसाई यांनाच जाते, असे मत प्रा. ए. जी. थोरात यांनी व्यक्त केले. लोकनेते बाळासाहेब देसाई जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात 'लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे जीवनकार्य' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

प्रा. थोरात यांनी देसाई यांच्या कार्याचा आढावा घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीत देसाई यांनी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. शैक्षणिक सल्लागार प्रा. डॉ. डी. आर. मोरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या वेळी शिवराज देसाई, राजेंद्र देसाई, अरुणराव देसाई, पृथ्वीराज देसाई, मायाताई देसाई, रेखाताई देसाई, विद्याताई दाभाडे आदी देसाई कुटुंबीय उपस्थित होते. लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, एस. पी. क्रिकेट अ‍ॅकॅडमी विजयी

## विनोदकुमार सचदेव चषक टी-२० क्रिकेट

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

जिल्हा क्रिकेट असो. तर्फे राजाराम कॉलेज मैदानावर सुरू असणाऱ्या 'विनोदकुमार सचदेव चषक' टी -२० किक गट क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ व एस. पी. अ‍ॅकॅडमी चंदगड यांनी प्रतिस्पर्ध्यांना नमवत आघाडी मिळविली.

**शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ ६० धावांनी विजय**

कै. आण्णा मोगणे सहारा स्पोर्टस् अ‍ॅकॅडमी 'क' विरुद्ध शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्यामध्ये खेळविणेत आला. या सामन्यात शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने ६० धावांनी विजय संपादन केला. प्रथम फलदांजी करताना शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ३ बाद १७० धावा केल्या. यामध्ये सागर पोवार नाबाद ६४, अनिल पाटील ३८ धावा केल्या. सहारा स्पोर्टस्च्या मनीष राजगोळीकर, करण मिरजकर व सत्यजित मल्लोळे यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. उत्तरादाखल सहारा संघ २० षटकांत ९ बाद ११० धावांपर्यंत मजल मारू शकला. अक्षय वांरगे ३४, करण मिरजकर ३३, अमित सूर्यवंशी नाबाद २० धावा केल्या. शिवाजी विद्यापीठ संघाच्या सागर पोवारने १६ धावांत ५, अजित आयरेकर, योगेश दळवी, विश्वनाथ वरूटे व युवराज साबळे यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

**एस. पी. क्रिकेट संघाचा ४६ धावांनी विजय**

दुसरा सामना पॅकर्स क्रिकेट क्लब ब विरुद्ध एस. पी. क्रिकेट अ‍ॅकॅडमी, चंदगड यांच्यामध्ये झाला. एस. पी. क्रिकेट अ‍ॅकॅडमी, चंदगडने १९.४ षटकांत सर्वबाद ९६ धावा केल्या. यामध्ये अमोल जाधव ३४, युवराज चांदेकर २० धावा केल्या. पॅकर्सच्या राहुल वाघने ३, अजिंक्य देशमुख, अर्जुन देशमुख व आकाश पाटील यांनी प्रत्येकी २ विकेटस् घेतल्या. उत्तरादाखल पॅकर्सचा संघ अवघ्या ५० धावांत गुंडाळला. चंदगडच्या जोतिबा पाटीलने १९ धावांत ५, प्रवीण गावडेने २ विकेटस् घेतल्या.

2 8 MAR 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा तुटीचा अर्थसंकल्प

## अधिसभेत तीनशे एकसष्ट कोटींच्या खर्चास मंजुरी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचा या आर्थिक वर्षाचा दोन कोटी पासष्ट लाख तेरा हजार रुपयांचा तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यात ३६१ कोटी ७९ लाख २४ हजार ५०० रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. या अर्थसंकल्पातील काही तरतुदींवर अधिसभेच्या सदस्यांनी विविध सूचना नोंदवल्या, तर चर्चेनंतर या अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली. यावेळी सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा समावेश मॅनेजमेंट कौन्सिलच्या मान्यतेने रिव्हाईज बजेटमध्ये करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात अधिसभा पार पडली. हे अंदाजपत्रक तयार करताना वित्त विभागामध्ये विद्यापीठाची स्वतःची वेबबेस्ड अंदाजपत्रक प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे अंदाजप्रत्रकामध्ये असलेली तरतूद, लेखशीर्षकनिहाय व पावती व प्रमाणकनिहाय प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशील यांसह अन्य आवश्यक माहितीचे लॉगइन सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यामुळे यंदा पेपरलेस पद्धतीने अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अंदाज पत्रकात देखभाल, वेतन, विकास,



एजन्सी आणि निलंबन अशा पाच विभागांत विभागणी करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांनी अधिसभेसमोर गतवर्षीच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव अधिसभेसमोर सादर केला. विस्तृत चर्चेनंतर या प्रस्तावास अधिसभेने मान्यता दिली, तर या वर्षीचा अर्थसंकल्प प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी अधिसभेसमोर सादर केला. यावेळी सदस्यांनी शिल्लक, खर्च याविषयी विविध प्रश्न उपस्थित केले. अंदाजपत्रकात दिव्यांग विद्यार्थी तसेच खेळाडूंसाठी विशेष तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली. दिव्यांगांसाठी अनेक सुविधा देण्यात आल्या आहेत, तसेच सदस्यांच्या सूचनेनुसार त्यामध्ये वाढ करण्यात येईल, असे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी सांगितले. अंदाजपत्रकात विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा, खेळाडूंसाठी अधिकची तरतूद करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली, तर संगणक आणि आधुनिकीकरणासाठी करण्यात येणाऱ्या खर्चावर काही सदस्यांनी अक्षेप नोंदवत तो खर्च कमी करण्याची सूचना केली.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळणाऱ्या खेळाडूंच्या आहारासाठी दोन लाख रुपये दिले जाणार आहेत. या योजनेचा दोन खेळाडूंना लाभही झाला आहे, तर जे खेळाडू बाहेर खेळण्यासाठी जाणार आहेत त्यांना विम्याचे कवच देण्यात येणार आहे. एनसीसी आणि एनएसएसच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष तरतूद करण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. विविध विषयांवरील चर्चेनंतर अधिसभेने अंदाजपत्रकास मान्यता दिली.

चर्चेत भैया माने, प्रताप पाटील, नसिमा हुरजूक, अनिल चैगले, यशवंत भालकर, मधुकर पाटील, सागर डेळेकर आदींनी सहभाग घेतला. अधिसभेसाठी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

### संशोधक विद्यार्थ्यांसाठीचा निधी वाढवा

विद्यापीठाची गुणवत्ता वाढत आहे. संशोधन करणारे विद्यार्थीही वाढत आहेत; मात्र त्यांच्यासाठी असलेल्या निधीमध्ये वाढ झालेली नाही. त्यामुळे त्यांच्यासाठीच्या निधीमध्ये वाढ करण्यात यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांकडून करण्यात आली. तसेच खेळांसाठी ही तुटपुंजा निधी मिळत असून खेळाडूंच्या सोयी-सुविधांसाठी निधी वाढवण्याची मागणी सदस्यांनी केली.

# सिनेट सदस्यांकडून प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती

## अधिसभा बैठकीत ११ प्रश्नांवर चर्चा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकीत सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. प्रश्नोत्तराच्या एका तासात सदस्यांनी प्रश्नांची सरबत्ती करत विद्यापीठ प्रशासनाला जाब विचारला. सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. तसेच प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन संचालक मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे आदी उपस्थित होते.

कमला कॉलेजमधील इंग्रजीच्या प्राध्यापिका सुमती साळुंखे यांच्या तक्रारीवर कोणता निर्णय घेण्यात आला, या अलका निकम यांच्या प्रश्नाने या सत्राची सुरुवात झाली; मात्र हा निर्णय न्यायप्रविष्ट असल्याने व डॉ. निकम अनुपस्थित असल्याने चर्चा झालीच नाही. शिवाजी विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे आजपर्यंत किती तक्रारी दाखल झाल्या असून, प्रलंबित तक्रारींबाबत किती दिवसांत निर्णय होणार आहे, हा प्रश्न अशोक पाटील यांनी लेखी उपस्थित केला. या प्रश्नाला उत्तर देताना धैर्यशील पाटील यांनी ५७ तक्रारी दाखल झाल्या असून, तक्रार निवारण समितीमध्ये एका सदस्याची नियुक्ती करणे बाकी असल्यामुळे समिती स्थापन झालेली नसल्याचे स्पष्ट केले; मात्र समिती स्थापन करण्यासाठी निश्चित कालावधी देण्यास विद्यापीठ प्रशासन यावेळी असमर्थ असल्याचे सांगण्यात आल्याने या प्रश्नावर जोरदार चर्चा झाली. दरम्यान, सभेला अनुपस्थित असलेल्या डॉ. इला जोगी यांच्या सातारा येथील अर्धवेळ सेवामुक्त शिक्षकास नेट-सेट परीक्षेतून सूट दिल्यासंदर्भात उपस्थित केलेल्या लेखी प्रश्नावर कोणताही उपप्रश्न न आल्याने या प्रश्नावरही चर्चा झाली नाही.

वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागातून विभागपदावरून निवृत्त होऊन दोन वर्षे उलटून गेल्यानंतरही ओमप्रकाश कलमे यांनी विद्यापीठाच्या अधिकृत निवासस्थानावरील हक्क सोडलेला नाही. निवृत्तीनंतर दोन वर्षांपासून डॉ. कलमे विद्यापीठाच्या निवासस्थानी वास्तव्यास आहेत. या काळात त्यांनी भाड्यापोटी रक्कमही विद्यापीठाकडे जमा केलेली नाही.

## अधिसभेसमोर 'सुटा'ची निदर्शने

**कोल्हापूर :** 'सुटा'च्या अधिसभा सदस्यांनी १८ प्रश्न आणि सात ठराव सादर केले; पण कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यातील चारच प्रश्न अधिसभेसाठी ठेवले. या निषेधार्थ शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ 'सुटा'च्या अधिसभा सदस्यांनी अधिसभेबाहेर निदर्शने केली.

शिवाजी विद्यापीठामध्ये शैक्षणिक सल्लागारपद निर्माण करून त्यावर नेमणूक केली आहे का? कुलगुरू शिवाजी विद्यापीठात किती दिवस आणि मुंबई विद्यापीठात किती दिवस उपस्थित होते? माजी कुलसचिवांच्या चौकशीचा अहवाल प्रशासनाकडे प्राप्त झाला आहे का? नव्याने नियुक्त केलेल्या शैक्षणिक सल्लागारांकडून कोणते सल्ले विद्यापीठ प्रशासनाला मिळाले? त्यांची पात्रता, निकष कोणते आहेत? आदी प्रश्न अधिसभेत ठेवण्यास नकार देण्यात आला. याविरोधात सुटाच्या सदस्यांनी यापूर्वीच अधिसभेवर बहिष्कार टाकण्याचे जाहीर केले होते. मंगळवारी (दि. २७) दुपारी १२.१५ वा.च्या सुमारास सुटाचे सदस्य विद्यापीठात आले. त्यांच्या हातात निषेधाचे फलक होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAR 2018
पुढारी

# तुटीच्या अंदाजपत्रकास मंजुरी

## तीनशे एकसष्ठ कोटींची जमा; सदस्यांनी मांडल्या सूचना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या २ कोटी ६५ लाख १३ हजार इतक्या रकमेच्या तुटीच्या अंदाजपत्रकास अधिसभेने मंगळवारी मान्यता दिली. ३६१ कोटी ७९ लाख २४ हजार ५०० इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकावर सदस्यांनी सविस्तर चर्चा करून अनेक सूचना केल्या. विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा वाढवण्यासाठीची तरतूद वाढवा तसेच कंत्राटी सुरक्षा रक्षकांसाठीची असलेली तरतूद एक कोटी रुपयांनी कपात करा, आदी सूचना यावेळी करण्यात आल्या. संशोधन, प्रशासकीय प्रशिक्षण आणि आधुनिकीकरणासाठी भरीव तरतूद हे अंदाजपत्रकाचे वैशिष्ट्य आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. राजर्षी शाहू सभागृहात अधिसभा झाली. यंदाचे अंदाजपत्रक वेबबेस्ट प्रणालीद्वारे ऑनलाईन सादर केले. सदस्यांना लॅपटॉपद्वारे पेपरलेस पद्धतीने अंदाजपत्रक दिले. गतवर्षाच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांनी अधिसभेसमोर सादर केला. सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे कारंडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी दिली.

यंदाचे (२०१८-१९) चे अंदाजपत्रक प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी अधिसभेसमोर मांडले. विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा, खेळाडू, सांस्कृतिक विद्यार्थी आदींसाठी तरतूद वाढविण्याचा आग्रह काही सदस्यांनी धरला. कॉम्प्युटर, आधुनिकीकरण आदींवर खर्चाबाबत सदस्यांनी आक्षेप घेत प्रश्न उपस्थित केले. कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या तरतुदीतील एक कोटी रुपयांची कपात करण्याची मागणी झाली. अंदाजपत्रकात दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत नियमानुसार निधीची तरतुदीची मागणीही केली. सदस्यांच्या सूचनांचा विचार करून सप्टेंबरमध्ये रिव्हाईज बजेटमध्ये या गोष्टींचा समावेश करण्याचे आश्वासन यावेळी सभेचे सचिव व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिले.

अध्यक्ष व कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जे खेळाडू खेळण्यासाठी बाहेर जातात त्यांना विमा कवच देऊ. आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या आहारासाठी दोन लाख रुपये दिले जातील. एनसीसी, एनएसएस आदी विद्यार्थ्यांसाठीही तरतूद केली जाईल. यावेळी प्रताप पाटील, भैया माने, नसिमा हुरजूक, अनिल चौगुले, मधुकर पाटील, शंकर कुलकर्णी, सागर डेळेकर आदींसह सदस्यांनी सूचना केल्या. अधिसभेस प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींसह अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

28 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांसाठी भरीव निधी द्या

## अधिसभेत सूचना : विद्यापीठाच्या ३६१ कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या २०१८-१९ आर्थिक वर्षाच्या २ कोटी ६५ लाख १३ हजाराच्या तुटीच्या अंदाजपत्रकास अधिसभा सदस्यांनी मान्यता देत, अपेक्षित जमा होणाऱ्या ३६१ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकात सदस्यांनी विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून निधीच्या तरतुदीला मंजुरी दिली. संशोधन, क्रीडा, प्रशिक्षणाच्या मुद्द्यावर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार प्रस्तावित सुधारित अंदाजपत्रकात केला जाईल, असे सभा अध्यक्ष कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आश्वासन दिले.



### अंदाजपत्रकातील तरतुदी

- संशोधनासाठी पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी : १० लाख (प्रति विद्यार्थ्यासाठी ३० हजारांचा प्रस्ताव)
- चर्चासत्र, सेमिनार, संशोधन कोर्ससाठी : १० लाख
- ॲकॅडमी फॉर ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशन : १० लाख
- संशोधन गुणवत्ता वाढीसाठी : १५ लाख
- जनरल बुक्स्‌साठी : १ कोटी ३० लाख
- अधिविभाग आधुनिकीकरण, प्रयोगशाळा : ४२ कोटी ३८ लाख

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आज झालेल्या अधिसभेत अंदाजपत्रक सादर केले. अधिसभेत विषय क्रमांक चारनुसार २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक व २०१८-१९ चे वार्षिक अंदाजपत्रक महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार अधिसभेत मान्यतेसाठी ठेवले. प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे यांनी अंदाजपत्रकातील तरतुदी विशद केल्या. प्रथमच हे अंदाजपत्रक संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन सादर केले. सदस्यांनीही लॅपटॉपवर सभेचे पेपरलेस कामकाज झाले. उपस्थित झालेल्या प्रश्नास प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले व डॉ. कारंडे यांनी उत्तरे दिली.

अंदाजपत्रकात विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा, संशोधक विद्यार्थ्यांना सुविधा, शिष्यवृत्ती, खेळाडू, विद्यार्थी कलाकारांना तरतूद

पान २ वर »

# विद्यार्थ्यांसाठी भरीव निधी द्या

» पान १ वरून

वाढवावी. खेळाडूंना दिले जाणारे भत्ते, प्रशिक्षणासाठी भरीव तरतूद करावी असा सदस्यांनी आग्रह धरला. कुलगुरूंसह पदाधिकाऱ्यांच्या संगणक, आधुनिकीकरणासाठी केलेल्या खर्चावर अनेकांनी आक्षेप घेतला. विद्यापीठात १२० सुरक्षा रक्षक आहेत. त्यातील फक्त १७ कर्मचारी कायम असून इतर कर्मचारी हे कंत्राटी आहेत. त्यांच्या वेतनासाठी तब्बल ३ कोटीहून अधिक रकमेची तरतुदीबाबत प्रश्न उपस्थित केले. त्या तरतुदीतील एक कोटीची रक्कम कपात करावी, अशी मागणी सदस्यांनी केली. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अपेक्षित तरतूद करून त्यांना तशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी केली.

**खेळाडूंसाठी विम्यासह अन्य सुविधा**

अध्यक्ष कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाचे जे खेळाडू बाहेर खेळण्यासाठी जातात, अशा खेळाडूंना विम्याचे संरक्षण दिले जाईल. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकणाऱ्या खेळाडूंसाठी दोन लाख रुपये दिले जातील. एनसीसी, एनएसएस आदी विद्यार्थ्यांसाठी भवित तरतूद करू, असे सांगितले. सूचनांचा सप्टेंबरमधील सुधारित अंदाजपत्रकात विचार करू, असे आश्वासन सचिव व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिले. चर्चेत भैय्या माने, नंदकुमार दिवटे, नसिमा हुरजूक, मधुकर पाटील, सागर डेळेकर, अनिल चौगुले आदींनी सहभाग घेतला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

### २०१८- १९ अंदाजपत्रक असे :

| तरतूद | अपेक्षित जमा रुपये | अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|
| देखभाल अंदाजपत्रक | ७८०२७०५०० | १७७७६१५०० |
| विकास अंदाजपत्रक | ४२३८५०००० | ४२३८५०००० |
| वेतन अंदाजपत्रक | ७१७६८०००० | ८००११६००० |
| एजन्सी स्कीम | १४०१०८००० | १८१६४००० |
| निलंबन लेखे | १४७५२१६००० | १३४३७४६००० |
| एकूण | ३,६१७१२४५०० | ३६४४४३७५०० |
| तूट | | २६५१३००० |

28 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध विषयांवरून अधिसभा गाजली

## सुटाच्या अधिसभा सदस्यांची धरणे, सभेवरही बहिष्कार : कुलगुरूंसोबत चर्चा निष्फळ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची मंगळवारी झालेली अधिसभा (सिनेट) विविध विषयांवरुन वादळी ठरली. यामध्ये निवृत्त प्राध्यापक ओमप्रकाश कलमे यांचे विद्यापीठाच्या क्वॉर्टर्समध्ये असणारे वास्तव्य, सन २०१६–२०१७ च्या वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरिक्षण अहवालातील त्रुटी यावर सदस्यांनी नेमकेपणाने बोट ठेवत प्रशासनाला धारेवर धरले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. दरम्यान, विद्यापीठाच्या सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाच्या २ कोटी ६५ लाख १३ हजार इतक्या रक्कमेच्या तुटीच्या अंदाजपत्रकास अधिसभेने मान्यता दिली. अपेक्षित जमा रुपये तीनशे साठ कोटी एकोणऐंशी लाख चोवीस हजार पाचशे रुपये इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकावर सदस्यांनी चर्चा करून अनेक सूचना केल्या.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार झालेल्या निवडणूकीनंतर अस्तित्वात आलेल्या अधिसभेची पहिलीच सभा मंगळवारी राजर्षी शाहू सभागृहात पार पडली. यंदाचे अंदाजपत्रक वेब बेस्ट प्रणालीच्या माध्यमातून सादर केले. सदस्यांना लॅपटॉपद्वारे पेपरलेस पध्दतीने अंदाजपत्रक दिले. या अंदाजपत्रकात देखभाल, विकास, वेतन, एजन्सी, निलंबन या पाच प्रकारात विभागणी केली होती. गतवर्षाच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव प्राचार्य डॉ. सी.टी. कारंडे यांनी सादर केला. यावेळी सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे कारंडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी दिली.

यंदाचे सन २०१८–१९ चे अंदाजपत्रक प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे यांनी अधिसभेसमोर मांडले. या अंदाजपत्रकात विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधा तसेच खेळाडू, सांस्कृतिक कार्यक्रम आदींसाठी तरतूद वाढवावी, यासाठी काही सदस्यांनी आग्रह धरला. तसेच कॉम्प्युटर, आधुनिकिकरण आदी खर्चाबाबत सदस्यांनी आक्षेप घेत प्रश्न उपस्थित केले. यावर सदस्यांच्या सूचनांचा विचार करून सप्टेंबरमध्ये रिव्हाईज बजेटमध्ये या गोष्टींचा समावेश करण्याचे आश्वासन सचिव व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिले. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडुंना विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडूंच्या आहारासाठी दोन लाख रूपये दिले जाणार आहेत. एनसीसी, एनएसएस, आदी विद्यार्थ्यांसाठी तरतूद केली जाणार आहे. अंदाजपत्रकावरील चर्चेत भैय्या माने, प्रताप पाटील, यशवंत भालकर, नसिमा हुरजूक, अनिल चौगुले, मधुकर पाटील, सागर डेळेकर आदींनी सहभाग घेतला. अधिसभेला प्र–कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, उपकुलसचिव डॉ. व्ही.एस. शिंदे आदींसह अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी, चॅरिटी कमिशनर यांच्या माध्यमातून माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात येत आहे. माजी विद्यार्थ्यांकडून आवश्यक निधीची तरतूद करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचेही सांगितले.

### अंदाजपत्रकातील ठळक वैशिष्ट्ये

- रिसर्च प्रमोशन स्किम फॉर पीजी स्टुडंटसाठी व ॲकॅडमी फॉर ॲकॅडमीक ॲडमिनिस्ट्रेशनसाठी प्रत्येकी १० लाखांची तरतूद.
- सेमीनार, कॉन्फरन्स, व रिफ्रेशर्स कोर्सेससाठी १० लाख.
- संशोधन गुणवत्ता वाढीच्यादृष्टिने सबस्क्रिप्शन टू स्कूप्स डेटाबेससाठी १५ लाख.
- प्लागीरिझम चेकिंग सॉफ्टवेअर्ससाठी ७ लाख.
- बुक जर्नल्स, ई–डेटाबेससाठी १ कोटी ३० लाख.
- विविध विभाग, अधिविभागाच्या आधुनिकिकरण, नुतनीकरण, प्रयोगशाळा उभारणीसाठी १८ कोटी ५२ लाख रूपयांची व संशोधन, विकास निधीतून २३ कोटी ८६ लाखाची तरतूद.
- नाविण्यपूर्ण योजनेसाठी ५० लाख.
- वृक्ष लागवडीसाठी व संगोपनासाठी २५ लाखांची तरतूद.

### डॉ. कलमे यांच्या विद्यापीठातील क्वॉटर्समधील वास्तव्यावर आक्षेप

निवृत्त झाल्यानंतरही दोन वर्ष झाली तरी प्राध्यापक ओमप्रकाश कलमे यांचे अद्यापि, विद्यापीठाच्या क्वॉटर्समध्ये वास्तव्य आहे. वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही त्यांनी क्वॉटर्स सोडलेले नाही. याबाबत अधिसभा सदस्यांनी आक्षेप घेत योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी प्रशासनाकडे केली. त्यावर कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेमार्फत डॉ. कलमे यांना नोटिस बजावून प्रसंगी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

### यंदा मेगा फेअरचे आयोजन, ८० कंपन्या होणार सहभागी

गेल्यावर्षी कॅम्पस इंटरव्ह्यू, पूल कॅम्पस अशा आयोजनातून ५६ कंपन्यांच्या माध्यमातून १८९० विद्यार्थ्यांची विविध कंपन्यात नियुक्ती झाली होती. मात्र, २०१७–१८ मध्ये केवळ १४ कंपन्यांचा सहभाग राहिला आणि त्यात ५३० उमेदवारांची नियुक्ती झाली आहे. यावर्षी ही संख्या कमी का, असा प्रश्न विचारला. त्यावर कुलगुरू यांनी यंदा मेगा फेअरचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी ८० कंपन्यांनी येथे येण्याचे मान्य केले आहे, असे सांगितले.



- सेवानिवृत्तीनंतरही प्रा.कलमे यांचा विद्यापीठातील क्वॉटर्समध्ये निवास : सदस्यांचा तीव्र आक्षेप
- २०१८-१९ च्या २ कोटी ६५ लाख १३ हजारांच्या तुटीच्या अंदाजपत्रकास अधिसभेची मान्यता

### सुटाच्या अधिसभा सदस्यांचे धरणे

सुटाच्या अधिसभा सदस्यांचे प्रश्न व ठराव बेकायदेशीररित्या व मनमानी पध्दतीने नाकारल्याचा आरोप करत अधिसभा सदस्यांनी विद्यापीठासमोर धरणे आंदोलन केले. या आंदोलनापूर्वी अधिसभा सदस्यांनी शाहू हॉलसमोर प्रश्न नाकारल्याबद्दल कुलगुरूंचा निषेध असो, सदस्यांच्या लोकशाही हक्कावर गदा आणणाऱ्या कुलगुरूंचा निषेध असो, अशा घोषणा दिल्या. यानंतर अधिसभेच्या बैठकीवरही बहिष्कार टाकण्यात आला.

मंगळवारी धरणे आंदोलनापूर्वी कुलगुरू डॉ. शिंदे व सुटा सदस्यांची बैठक झाली. यावेळी बहिष्कार मागे घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. मात्र, या बैठकीतील चर्चा निष्फळ ठरली. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष अरूण पाटील, प्रा. ए. बी.पाटील, प्रा. डॉ. एन. के. खंदारे, प्रा. डॉ. इला जोशी, प्रा. डॉ. अलका निकम, प्रा. डॉ.एम.डी. गुजर, डॉ. राजेंद्र थोरात आदींचा सहभाग होता.

28 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कला, वाणिज्य 'सेमिस्टर' पद्धत बंद

## अधिसभेत ठरावास मान्यता : निवृत्त प्राध्यापकांच्या निवासस्थानावरून वादळी चर्चा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठातील कला आणि वाणिज्य अभ्यासक्रमाची सेमिस्टर परीक्षा पद्धत बंद करून वार्षिक परीक्षा पद्धत सुरू करावी, या ठरावाला विद्यापीठाच्या अधिसभेत सदस्यांनी मान्यता दिली. निवृत्तीनंतर दोन वर्षे उलटून गेली तरी निवासस्थान न सोडणाऱ्या प्रा. डॉ. ओमप्रकाश कलमे यांच्यावर कारवाई का केली जात नाही? याबाबत सदस्यांनी प्रशासनावर प्रश्नांचा भडीमार केला. अधिसभा आज राजर्षी शाहू सभागृहात झाली. तब्बल सात तासांहून अधिककाळ चालली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदस्य प्रताप माने यांनी कला, वाणिज्य शाखेतील सेमिस्टर परीक्षेमुळे विद्यार्थी व महाविद्यालये परीक्षार्थी झाले आहेत. महाविद्यालय सुरू झाले की महिन्याभरात परीक्षा फॉर्म भरावा लागतो. त्यानंतर लगेच पहिल्या सेमिस्टरचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात प्राध्यापक व तो समजून घेण्यात विद्यार्थी लागतात. ती परीक्षा संपते न् संपते तोच दुसऱ्या सेमिस्टरची तयारी सुरू होते. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. त्यामुळे सेमिस्टर पद्धत बंद करून दोन्ही शाखेसाठी एकच वार्षिक परीक्षा घ्यावी, असा ठराव मांडला. यावर दोन्ही बाजूने चर्चा झाली. यात शंकरराव कुलकर्णी, नंदकुमार दिवटे यांनी सेमिस्टर पद्धतीमुळे विद्यार्थी सतत अभ्यासात असतो. मात्र, वार्षिक परीक्षेमुळे वर्षाच्या शेवटीच अभ्यास करतो, याचा विचार व्हावा अशी मागणी केली. यानंतर कला व वाणिज्य शाखेसाठी एकच वार्षिक परीक्षा घ्यावी या ठरावाला सदस्यांनी मान्यता दिली. त्यामुळे हा ठराव पुढील मंजुरीसाठी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषदेकडे ठेवण्यात येईल.

सभेत डॉ. सतीश घाटगे यांनी विद्यापीठातील किती प्राध्यापकांना सेवा निवृत्तीनंतर एक वर्षापेक्षा अधिक काळ उलटून गेला तरी ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही असा प्रश्न उपस्थित केला.



वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागातील विभागप्रमुख पदावरून डॉ. ओमप्रकाश कलमे हे निवृत्त होऊन दोन वर्षाचा कालावधी झाला आहे. पण अद्याप त्यांनी निवासस्थानावरील हक्क सोडलेला नाही. याबाबत प्रशासनाने का कारवाई केली नाही? त्यांनी किती भाडे जमा केले? असा सवाल सदस्यांनी केला. त्यांच्याशी पत्रव्यवहार करूनही त्यांनी निवासस्थान सोडले नाही की निवासभाडेही जमा केले नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. आर्थिक नुकसानीबाबत प्रशासन गप्प का? त्यांच्यावर कारवाईस विलंब का? त्यांच्यावर न्यायिक कारवाई करा, दंड आकारा, अशा मागण्यांचा भडीमार डॉ. प्रताप पाटील, नंदकुमार दिवटे, नसीमा होरजूक, शंकरराव कुलकर्णी आदी सदस्यांनी करत प्रशासनाला कात्रीत धरले. यावर उत्तर देताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व प्रकाश कुंभार म्हणाले, "अद्याप डॉ. कलमे यांनी ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली नाही. त्यांच्यावर अध्यक्षांच्या मार्गदर्शनानुसार पुढील कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर दुसरे प्राध्यापक डॉ. डी. श्रीकांत यांच्याकडूनही अद्याप ना-हरकत प्रमाणपत्राची पूर्तता झाली नसल्याचे सांगितले. ती करून घेऊ, असे सांगितले.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे किती तक्रारी दाखल झाल्याचा प्रश्न अशोक पाटील यांनी उपस्थित केला. याबाबत धैर्यशील पाटील यांनी समितीकडे ५७ तक्रारी दाखल झाल्या आहेत. तक्रारीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी येऊ शकतात. त्यामुळे त्यांचा प्रतिनिधी आहे का? असा प्रश्न सदस्यांनी उपस्थित केला. यावर तशी कायद्यात तरतूद नसल्याचे सांगण्यात आले. खुल्या प्रवर्गातील पदावर मागासवर्गीय कर्मचारी व अधिकारी पदोन्नती करताना सेवाज्येष्ठता नियमाचा आधार का घेतला जात नाही. या प्रश्नावर न्यायालयाच्या आदेशानुसार नव्हे तर सरकारी आदेशानुसारच याबाबत निर्णय घेतला जात असल्याचे डॉ. नांदवडेकर यांनी स्पष्ट केले. खोटी प्रवास बिले जोडणाऱ्या प्रा. जे. एस. पाटील यांच्यावर केवळ दंडात्मकच कारवाई का केली जाते? असा प्रश्न अमरसिंह रजपूत यांनी उपस्थित केला. अशा प्रकारामुळे चुकीचा पायंडा पडू शकतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. युरोपियन युनियन संस्थेसमवेत सहकार्य प्रकल्पात देशातील आठ संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला. त्याचा विद्यार्थ्यांना काय फायदा झाला? असा प्रश्न प्रताप माने यांनी उपस्थित केला. त्याचबरोबर वर्षभरात विविध संशोधनपर सामंजस्य कराराबाबत साडेसात लाखांचा निधीचा वापर यातून विद्यार्थ्यांना होणारा फायदा याबाबत उपस्थित प्रश्नावरूनही सभा गाजली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन संचालक मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे आदींसह अधिकारी उपस्थित होते.

### विद्यापीठात प्लेसमेंट कक्ष

**विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाव्यात यासाठी स्वतंत्र प्लेसमेंट सेलची स्थापना करण्याची मागणी सदस्यांनी केली. गेल्या पाच वर्षांत एकूण ५८४१ विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांनी नियुक्त केल्याची माहिती देण्यात आली. मात्र, ही संख्या कमी असून प्लेसमेंट सेलसाठी पूर्णवेळ अधिकारी व स्टाफ नियुक्त करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. त्यानुसार ग्रंथालयाजवळ स्वतंत्र प्लेसमेंट सेल सुरू करून तेथे कौशल्य विकास प्रशिक्षणही देण्याचा प्रयत्न करू, असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 MAR 2018

पुढारी

# सेमिस्टर परीक्षा पद्धत बंद करा

## विद्यापीठ अधिसभेत एकमताने ठराव मंजूर; सदस्यांकडून प्रशासन धारेवर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य अभ्यासक्रमांच्या परीक्षांमध्ये सेमिस्टर पद्धतीने सर्व विद्यार्थी व महाविद्यालये शिक्षणाऐवजी परीक्षार्थी बनले आहेत. अभ्यासापेक्षा विद्यार्थी परीक्षेत अडकलेला आहे. त्यामुळे सेमिस्टर परीक्षा पद्धत बंद करून वार्षिक परीक्षा पद्धत सुरू करावी, हा ठराव शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेने मंगळवारी एकमताने मंजूर केला. यासह निवृत्त प्राध्यापक ओमप्रकाश कलमे यांनी निवृत्तीनंतरही निवासस्थान (क्वार्टर्स) सोडलेले नसल्याबद्दल सभेत अनेक सदस्यांनी आक्रमक भूमिका घेत कारवाईची मागणी केली. खुल्या प्रवर्गातील पदांवर मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनापदोन्नतकरतानाकोणत्या कायद्याचा आधार घेतला?, प्लेसमेंट सेल स्वतंत्र कार्यालय करा, सामंजस्य कराराचा विद्यार्थ्यांना उपयोग काय? आदी मुद्द्यांवर प्रश्नोत्तराच्या तासात सदस्यांनी प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती करत प्रशासनाला धारेवर धरले.

शिवाजी विद्यापीठ अधिसभेची वार्षिक बैठक मंगळवारी राजर्षी शाहू सभागृहात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. देवानंद शिंदे तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

कला, वाणिज्य अभ्यासक्रमांच्या सेमिस्टर पद्धतीने होणाऱ्या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने ही पद्धत बंद करावी, या सदस्य भैया माने यांच्या ठरावास अधिसभेत एकमताने मंजुरी दिली. खुल्या प्रवर्गातील पदावर एकूण १६ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर २९ जणांना अशा पदांवर पदोन्नती देण्यात आली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. याबाबतचा प्रश्न सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी विचारला. याबाबत कोणत्या कायद्याचा आधार घेतला आहे याबाबत माहिती सदस्यांकडून प्रशासनाला विचारण्यात आली.

खोटी बिले सादर करून प्रवासभत्ता लाटणाऱ्या जे. एस. पाटील या अधिष्ठातावर कारवाई का केली नाही, असा प्रश्न अमरसिंग रजपूत यांनी उपस्थित केला. यावेळी संबंधित अधिष्ठातांकडून लावलेले जादा बिल वसूल करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. युरोपियन संस्थेसोबत सहकार्य प्रकल्पात भारतातील आठ संस्थांत शिवाजी विद्यापीठाचा समावेश असून, याचा विद्यार्थ्यांचा फायदा काय झाला, असा प्रश्न भैया माने यांनी उपस्थित केला. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून ५८४१ विद्यार्थ्यांना कंपन्यांनी नियुक्त केले असले तरी ही संख्या कमी असल्याचे प्रश्नांवर भविष्यात हा आकडा वाढेल असे प्रशासनाने सांगितले. तक्रार निवारण समितीकडे दाखल झालेल्या तक्रारी, वाय-फाय सेवेची वाढलेली गती यासह विविध प्रशासकीय कामकाजावर चर्चा झाली. विद्यापीठ प्रशासनातील रिक्त पदे तातडीने भरावीत व ज्यांना पदोन्नती द्यावयाची आहे त्यांना पदोन्नती देण्यात यावी, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली. सभेसाठी १६ लेखी प्रश्न विचारण्यात आले. परंतु, एक तासाच्या निर्धारीत वेळेत अकरा प्रश्नांवरच चर्चा झाली.

यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य धैर्यशील पाटील, संजय जाधव, डॉ. बी. एन. गायकवाड आदींनी प्रश्नांबाबत खुलासा केला. सभेस परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आदींसह बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.

### स्वायत्त निधीचे नियोजन करावे

*नामवंत विद्यापीठांचा कारभार हा माजी विद्यार्थी व हितचिंतकांनी दिलेल्या देणगी निधीतून चालतो. त्यामुळे विद्यापीठानेही याबाबत नियोजन करून स्वायत्त निधीची रचना तयार करावी. यासाठी अनेकजण निधी देतील. या निधीतून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना सोयी व सुविधा देता येतील, असा मुद्दा सदस्यांनी उपस्थित केला. याबाबत प्रशासनाने सकारात्मकता दर्शविली.*

### डॉ. कलमे यांच्यावर न्यायिक कारवाईची मागणी

सेवानिवृत्तीनंतर एक वर्षापासून अधिक काळ नो ड्युज सर्टिफिकेट घेतले नसलेल्या प्राध्यापकांबाबत डॉ. सतीश घाटगे यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी डॉ. कलमे आणि डी. श्रीकांत या दोन प्राध्यापकांना नो ड्युज मागणी न केल्याने दिले नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

लोकमत

## कला, वाणिज्य शाखेची सेमिस्टर परीक्षा होणार बंद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य शाखेची सेमिस्टर (सत्र) पद्धती बंद करावी. प्रत्येक महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजना सुरु करावी, हे ठराव मंगळवारी विद्यापीठाच्या अधिसभेत एकमताने मंजूर झाले. निवृत्तीनंतरही दोन वर्षे विद्यापीठातील निवासस्थान सोडत नसलेल्या डॉ. ओमप्रकाश कलमे यांच्यावर प्रशासन कारवाई का करीत नाही? असे प्रश्न उपस्थित करुन सदस्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. -वृत्त/हॅलो १

28 MAR 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### विद्यापीठाच्या अधिसभेत ठराव मंजूर : महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजना; सदस्यांकडून अधिकारी धारेवर

# कला, वाणिज्यची 'सेमिस्टर' बंद होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य शाखेची सेमिस्टर (सत्र) पद्धती बंद करावी, प्रत्येक महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजना सुरु करावी, हे ठराव मंगळवारी विद्यापीठाच्या अधिसभेत एकमताने मंजूर झाले. निवृत्तीनंतरही दोन वर्षे विद्यापीठातील निवासस्थान सोडत नसलेल्या डॉ. ओमप्रकाश कलमे यांच्यावर प्रशासन कारवाई का करीत नाही? बेकायदेशीरपणे प्रवास बिले घेणाऱ्या माजी अधिष्ठात्यांवर कारवाई का केली नाही? प्लेसमेंट सेलला स्वतंत्र कार्यालय कधी देणार? असे प्रश्न उपस्थित करुन सदस्यांनी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

### सत्र परीक्षेला सुमारे ७५ हजार विद्यार्थी



कला, वाणिज्य शाखेची सेमिस्टर परीक्षा बंद करण्याचा अधिसभेने केलेला हा ठराव पहिल्यांदा परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे जाईल. यानंतर तो विद्या परिषदेसमोर सादर होईल. या दोन्ही अधिकार मंडळांतील निर्णयानंतर या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही होईल.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी बारा वाजता अधिसभेच्या बैठकीला सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी कुलगुरु डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा सादर केला. सभेत प्रताप माने यांनी विद्यापीठामध्ये कला, वाणिज्य परीक्षांमध्ये सेमिस्टर पद्धतीमुळे सर्व विद्यार्थी व महाविद्यालये शिक्षणार्थीऐवजी परीक्षार्थी झाली आहेत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तरी याबाबत विद्यापीठाने सेमिस्टर पद्धती बंद करून वार्षिक परीक्षा सुरु करावी, असा ठराव मांडला. यासाठी डॉ. प्रताप पाटील सूचक, तर एम. एल. पाटील अनुमोदक होते. या ठरावावर १५ मिनिटांहून अधिक वेळ दोन्ही बाजूंनी चर्चा झाली. अखेर सभागृहाने एकमताने हा ठराव मंजूर केला. प्रत्येक महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजना सुरु करण्याचा ठराव मान्य झाला. विविध परीक्षांसाठी केलेल्या विविध कामांचा मोबदला अथवा मानधन वाढविण्याच्या ठरावासही मान्यता दिली. प्रशासनातील रिक्त पदे तातडीने भरावीत. पात्र शिक्षकांची प्रोफेसर पदावरील स्थाननिश्चिती सत्वर करावी, हे ठराव मागे घेतले.

## ओमप्रकाश कलमे यांच्यावर कारवाई करा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अधिसभेत प्रश्नोत्तरांच्या तासात १६ पैकी ११ प्रश्नांवर चर्चा झाली. यामध्ये अशोककुमार पाटील यांनी तक्रार निवारण समितीकडील प्रलंबित तक्रारी, त्यांचा निवाडा, आदींबाबतचा प्रश्न सादर केला. त्याला धैर्यशील पाटील यांनी शिक्षकांच्या ४७, तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या १० तक्रारी असल्याचे सांगितले.

डॉ. सतीश घाटगे यांनी विद्यापीठातील किती प्राध्यापकांना सेवानिवृत्तीनंतर एक वर्षापेक्षा अधिक काळापासून नो ड्यूज (ना हरकत) प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही? तसे असल्यास त्याची कारणे कोणती?, असा प्रश्न उपस्थित केला. याबाबत डॉ. ओमप्रकाश कलमे यांनी नो ड्यूजची मागणी केली नसल्याचे, तर डी. श्रीकांत यांनी स्वमूल्यमापन अहवाल सादर केलेला नाही; त्यामुळे त्यांना नो ड्यूज दिले नसल्याचे प्रकाश कुंभार यांनी सांगितले. यावर डॉ. प्रताप पाटील यांनी, डॉ. कलमे हे विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातून निवृत्त होऊन दोन वर्षे पूर्ण झाली असली, तरी त्यांनी विद्यापीठातील निवासस्थान सोडलेले नाही. त्याबाबत त्यांच्यावर कोणती कारवाई केली? असा उपप्रश्न केला. शंकरराव कुलकर्णी, नसिमा हुरजूक यांनीदेखील या अनुषंगाने मुद्दे मांडले. डॉ. कलमे यांना प्रशासन अभय का देत आहे? त्यांच्याकडून भाडे वसूल केले आहे का?, निवासस्थानी राहण्याबाबत मुदतवाढ मिळावी, अशी मागणी त्यांनी केली होती का? असे विविध प्रश्न अन्य सदस्यांनी उपस्थित करुन डॉ. कलमे यांना निवासस्थान सोडण्यासाठी नोटीस पाठवून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली. यावर कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, डॉ. कलमे यांनी विद्यापीठातील निवासस्थानी राहण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. त्यांना वेळोवेळी निवासस्थान सोडण्याबाबत प्रशासनाने पत्रे पाठविली आहेत. आता व्यवस्थापन (पान ५ वर)

28 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सेमिस्टर पद्धत बंद होणार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कला वाणिज्य शाखांमधील सत्रपरीक्षा (सेमिस्टर) पद्धत बंद करण्याचा ठराव अधिसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. प्रताप माने यांनी अधिसभेच्या वार्षिक बैठकीत हा ठराव मांडला. याबाबत सविस्तर चर्चा होऊन या ठरावाला मंजुरी देण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या अधिसभा बैठकीत सात ठराव आले होते.

माने यांनी सत्रपरीक्षा बंद करण्याचा



ठराव मांडताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा दाखला दिला. सत्रपरीक्षांमुळे विद्यार्थी केवळ परीक्षार्थी बनला आहे. अभ्यासातून संशोधन करण्यापेक्षा केवळ परीक्षेत मार्क मिळवण्याच्या मागे विद्यार्थी धावत आहे. तो परीक्षेतच अडकून राहिल्याने स्वयंअध्ययन ही प्रक्रिया मागे पडत आहे. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संकुचितपणावर होत आहे. त्यामुळे विद्यापीठाने परीक्षा विभागाच्यावतीने सत्र परीक्षा बंद करण्याचा ठराव मंजूर करावा, अशी मागणी माने यांनी केली. या मागणीला सदस्यांनीही दुजोरा देत ठराव मंजूर करावा अशी शिफारस केली. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने ठरावाबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, सातपैकी तीन ठराव मंजूर करण्यात आले.